प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०७ नोव्हेंबर २०२२**

## सिडकोची गृहनिर्माण क्षेत्रातील यशाची पुनरावृत्ती
## महागृहनिर्माण योजनेतील ७०० स्लॅबचे काम ५५५ दिवसांत केले पूर्ण

नवी मुंबईतील तळोजा नोडमधील सेक्टर-२८,२९,३१ व ३७ मध्ये साकारण्यात येत असलेल्या महागृहनिर्माण योजनेतील इमारतींमधील ५०० स्लॅबचे काम ४८९ दिवसांत पूर्ण केल्यानंतर, सिडको महामंडळाने पुन्हा एकदा डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली याच इमारतींमधील ७०० स्लॅबचे काम केवळ ५५५ दिवसांत पूर्ण करून गृहनिर्माण क्षेत्रातील आपल्याच यशाची पुनरावृत्ती केली आहे.

**"परवडणाऱ्या दरातील घरांचे बांधकाम नियोजित कालावधीत पूर्ण करण्याचे सिडकोचे उद्दिष्ट आहे. यासाठी गुणवत्तेशी कोणतेही तडजोड न करता, घरांचे बांधकाम वेगाने पार पाडण्याकरिता बांधकाम क्षेत्रातील प्रगत आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर सिडकोचा भर आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्नही वेळेत पूर्ण होणार आहे."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोतर्फे नवी मुंबईतील विविध नोडमध्ये ६७,००० घरांच्या (सदनिका) बांधणीचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने सिडकोची वेगाने वाटचाल सुरू आहे. परिहवन केंद्रित विकास संकल्पनेवर आधारित या गृहनिर्माण योजनेतील घरांचे बांधकाम रेल्वे स्थानक फोरकोर्ट, बस व ट्रक टर्मिनल परिसरात करण्यात येत आहे. यामुळे प्रवासाच्या वेळेत बचत होण्यासह सार्वजनिक वाहतुकीच्या वापरासही प्रोत्साहन मिळणार आहे.

महागृहनिर्माण योजने अंतर्गत तळोजा नोडमधील सेक्टर-२८,२९,३१ व ३७ मध्ये विकसित करण्यात येत असलेल्या इमारतींमधील ७०० स्लॅबचे काम केवळ ५५५ दिवसांत पूर्ण करण्यात आले आहे. दिवसाला

सरासरी १.२६ स्लॅब या विक्रमी वेगाने हे काम पूर्ण करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता सिडकोने ही कामगिरी पार पाडली आहे. सिडकोतील नियोजनकार व अभियंते, प्रकल्प सल्लागार टीसीई-एचएसए, एएचसी, कंत्राटदार बीजीएस ॲन्ड कं. यांनी डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी पार पाडली आहे.

या कामगिरीद्वारे सिडकोने गृहनिर्माणातील आपल्या यशाची पुनरावृत्ती केली आहे. सिडकोचे हे यश परवडणाऱ्या दरातील घरांच्या क्षेत्रातील एक सकारात्मक घडामोड आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या परवडणाऱ्या दरातील घरांचे स्वप्न कमी कालावधीत पूर्ण करण्याच्या दिशेने पडलेले हे आशादायी पाऊल आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको